A

Re-accredited by NAAC(2014)
With CGPA-3.16

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
## परीपत्रक

सर्व सलग्निंत अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्य / प्राचार्या / संचालक यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त परिस्थिती मूळे अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा अगोदर घेण्यात आलेल्या आहेत हे आपणास ज्ञांत आहेच. तसेच फेरतपासणीसाठी आलेल्या उत्तरपत्रिकेंची संख्या जास्त आहे. अशा परीस्थितीमध्ये बंहुतांश विद्यार्थ्याचें फेरतपासणीचे निकाल कमी वेळेमध्ये विद्यापीठाने जाहीर केलेले आहेत. उर्वरित निकाल ही तातडीने जाहीर करण्यासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु अंतिम मुदतीमध्ये फेरतपासणीसाठी आलेल्या अर्जांची संख्या जास्त असल्याने अशा काही विद्यार्थ्यांचें फेरतपासणीचे निकाल सुरू असलेल्या परीक्षेच्या पेपर पूर्वी जाहीर होणे शक्य नाही. तेंव्हा ज्या विद्यार्थ्याचें फेरतपासणीचे निकाल सुरू असलेल्या परीक्षेमधील पेपर पूर्वी जाहीर न झाल्यास अशा विद्यार्थ्यांनां त्या विषयाचे पेपर देण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

सदर विद्यार्थ्यांचें फेरतपासणीचे गुण व सुरू असलेल्या परीक्षेतील गुण यापैकी जे गुण अधिकचे असतील ते गुण अंतिम गुण ग्राहय धरण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. सदर चे परीपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

आपला विश्वासू

श्री. एम. ए. काकडे
(परीक्षा नियंत्रक)

जा.क्रं. शि.वि./ममुके/कॅप/187 दि. 14/04/2016

प्रत:

1)सर्व संलग्नित महाविद्यालय प्राचार्य/प्राचार्या/संचालक यांनी सदरचे परीपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे ही विनंती 2) मा. कुलगुरूसो कार्यालय 3) मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय 4) इंटरनेट विभाग